# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.08.2026** **वारःरविवार**

---

1. 'नशा मुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियानाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार सुरुवात
2. केंद्र सरकारकडून राज्यांना कर वितरणाचा अतिरिक्त हप्ता वितरित, महाराष्ट्राला 7 हजार 22 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी
3. लोकमान्य टिळक यांच्या 106 व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना देशभरात आदरांजली
4. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार पुण्यात प्रदान आणि
5. ग्लासगो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पदक तालिकेत भारताची चौथ्या स्थानावर झेप

**<u>पंतप्रधान-नशामुक्त अभियान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ प्रणालीद्वारे 'नशा मुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियानाला सुरुवात करणार आहेत. अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनते विरुद्धच्या 100 आठवड्यांच्या देशव्यापी 'जन भागीदारी' मोहिमेची सुरुवात या अभियानाद्वारे करण्यात येईल. देशभरातल्या 10 हजारांहून अधिक ठिकाणांहून तरुण या कार्यक्रमात सहभागी होतील. 'माय भारत' स्वयंसेवक, 'माय भारत' राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, युवा मंडळं, शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठं आणि 125 हून अधिक सहयोगी आध्यात्मिक संस्था या कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीनं सहभागी होणार आहेत.

**<u>केंद्र निधी</u>**

राज्यांच्या अर्थ व्यवस्थेला बळकटी देत विकासकामांना अधिक गती मिळावी, या उद्देशानं केंद्र सरकारनं सर्व राज्यांना 1 लाख 9 हजार कोटी रुपयांच्या कर वितरणाचा अतिरिक्त अग्रीम हप्ता वितरीत केला आहे. राज्यनिहाय वाटपानुसार, महाराष्ट्राला 7 हजार 22 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला आहे. या अतिरिक्त निधीमुळं राज्यांना पायाभूत सुविधा उभारणी, विविध विकास प्रकल्प, भांडवली खर्च तसंच लोककल्याणकारी योजनांसाठी आवश्यक आर्थिक तरतूद अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

**<u>टिळक पुरस्कार</u>**

लोकमान्य टिळक यांच्या 106 व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना काल देशभरात आदरांजली अर्पण करण्यात आली. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय असंतोषाचे जनक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांना स्मृतिदिनी अभिवादन केलं. पुण्यात लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे लोकमान्यांच्या स्मृतिदिनी दिला जाणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते काल प्रदान करण्यात आला. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचं स्वरूप देत सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजवली, असं प्रतिपादन शाह यांनी यावेळी केलं.

अजित डोभाल यांच्यविषयी बोलताना राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम आणि अभेद्य बनवण्यात त्यांचं योगदान अत्यंत मोलाचं आहे असं सांगून शाह म्हणाले.......

**कोई व्यक्ति जब समाज के किसी भी क्षेत्र में बहुत बड़ा काम करता है तब वो व्यक्ति नहीं रह जाता है और मैं मानता हूं कि आज तिलक पुरस्कार जो अजित डोभाल जी को मिला है, इस देश के लिए जीने वाले इस देश के लिए काम करने वाले हर सेक्टर के नागरिकों के लिए एक बहुत बड़ा प्रेरणा का स्थान बनेगा।**

अजित डोभाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून काम करताना त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे आयाम दिले असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसंच लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

युवकांनी समर्पण, त्याग आणि कर्तव्य भावनेनं विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावं असं आवाहन अजित डोभाल यांनी यावेळी केलं. पुरस्काराला उत्तर देताना ते म्हणाले.......

**लोकमान्य तिलक जी के जीवन को समझना, उनकी गहराइयों को देखना, उसके लिए उस समय के काल, उस समय के मजबूरियाँ और दयनीयता को शायद हम लोग उसकी कल्पना नहीं कर पाते। विशेषकर जो हमारा युवा वर्ग है वो सोचता है शायद जिसे हम स्वतंत्रता कहते हैं। शायद उनको लगता है कि स्वतंत्रता केवल वह करने की जो आपकी इच्छा है, स्वतंत्रता ये नहीं थी। हमारे युवाओं को ये सोचने की आवश्यकता है। कि जिस मार्ग पर जो भारत की उनकी परिकल्पना थी वो क्या थी और क्या भाव था राष्ट्र निर्माण का।**

## अण्णाभाऊ साठे अभिवादन

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काल महाराष्ट्रात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

## नीट पीजी शहा

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी काल पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीच्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा म्हणजेच नीट-पीजी परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. येत्या 30 ऑगस्ट रोजी ही परीक्षा होणार आहे. परीक्षा सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीनं सुरळीत पार पडावी या दृष्टीनं त्यांनी बैठक घेतली. त्यांनी परीक्षेशी निगडीत आयुर्विज्ञान राष्ट्रीय परीक्षा मंडळ, तंत्रज्ञान भागीदार तसंच इतर संबंधित घटकांकडून करण्यात आलेल्या तयारीची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता, परीक्षा मंडळ आणि आरोग्य मंत्रालयानं जारी केलेल्या अधिकृत सुचनांचं पालन करण्याचं आवाहन नड्डा यांनी केलं आहे.

## सीजेपी फंडिंग

जंतरमंतर इथं झालेल्या आंदोलनातील प्रमुख सहभागी कॉकरोच जनता पार्टी आणि इतर काही संस्थांना मिळालेल्या परदेशी मदतीविषयी महाराष्ट्र राज्य सरकारनं चौकशी सुरू केली आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी याविषयी माहिती दिली, या निधीचा वापर कसा करण्यात आला याची चौकशी सुरु आहे. सक्तवसुली संचालनालय देखील या प्रकरणाची समांतर चौकशी करत असल्याचं त्यांनी सांगितलं. हा निधी बेकायदेशीर कामांसाठी वापरल्याचं आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल असं भोयर यांनी स्पष्ट केलं आहे.

## उझबेकिस्तान-परराष्ट्र मंत्री

उझबेकिस्तानचे परराष्ट्र मंत्री सैदोव्ह बख्तियार ओदिलोविच आजपासून भारताच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, या दौऱ्यादरम्यान ओदिलोविच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेतील. दिल्लीत आयोजित एका व्यापार मंचाच्या कार्यक्रमातही ते सहभागी होतील.

**पेरू अपघात**

पेरू देशात नाझका शहरात पर्यटकांना स्थलदर्शनासाठी घेऊन जाणाऱ्या एका विमानाचा अपघात होऊन 13 पर्यटक मृत्यूमुखी पडले. स्थानिक एरोडियाना कंपनीच्या या विमानाच्या अपघाताच्या कारणांचा तपास सुरू असल्याचं पेरूच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**बॅडमिंटन**

तैपेई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात, आज भारताच्या तन्वी शर्मा हिचा सामना व्हिएतनामच्या थुई लिन्ह गुयेन हिच्याशी होईल.

**टेनिस**

टेनिसमध्ये, भारताच्या रामकुमार रामनाथन आणि विजय सुंदर प्रशांत यांनी काल जर्मनीतील 'बॉन खुल्या स्पर्धेच्या दुहेरीचं विजेतेपद पटकावलं. या भारतीय जोडीनं इंग्लंडचा स्कॉट डंकन आणि स्वीडनचा ॲडम हेनोनन यांचा 7-6, 6-3 असा पराभव केला.

**राष्ट्रकुल**

ग्लासगो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतानं 13 सुवर्ण, 17 रौप्य आणि 9 कास्य पदकांसह एकंदर 39 पदकं जिंकून काल पदक तालिकेत चौथ्या स्थानावर झेप घेतली. सात सुवर्ण आणि तीन रौप्य पदकांसह भारतानं मुष्टियुद्ध स्पर्धेतील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. यातील शेवटची 2 सुवर्ण पदकं अंकुश पांघल आणि सचिन सिवाचनं जिंकली. सुवर्णपदक जिंकणाऱ्या इतर भारतीय मुष्टियोद्ध्यांमध्ये जास्मिन लंबोरिया, प्रीती पवार, साक्षी चौधरी, प्रिया घांघस आणि अरुंधती चौधरी यांचा समावेश आहे. पॅरा-ॲथलेटिक्समध्ये सोमन राणानं पुरुषांच्या 'शॉट पुट F57' प्रकारात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतलं भारताचं पहिलं सुवर्णपदक, तर शुभम जुयालनं रौप्यपदक जिंकलं.

लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंगनं 10 हजार मीटर शर्यतीतील रौप्यपदकानंतर 5 हजार मीटर शर्यतीत कास्यपदक पटकावून ऐतिहासिक कामगिरी केली. स्पर्धेच्या एकाच आवृत्तीत ट्रॅक अँड फील्ड ॲथलीट प्रकारात दोन पदकं जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला. तसंच 5 हजार मीटर प्रकारात राष्ट्रकुल पदक जिंकणाराही तो पहिलाच भारतीय आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रकुल स्पर्धेतील ऐतिहासिक कामगिरीबद्दल खेळाडूंचं अभिनंदन करून भविष्यात आणखी मोठे टप्पे गाठण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज कर्नाटक, केरळ, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पुढील दोन दिवसांत उत्तरेकडील काही राज्यात तसंच अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि अंदमान-निकोबार बेटांवरही मुसळधार पावसाची शक्यता विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.